# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३८९/२०२२/अहिल्यानगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अनिल एकनाथ चांदणे, रा.आझाद चौक(विटभट्टी), बुरुडगल्ली, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर. | रचना सहाय्यक, नगर रचना विभाग, राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर.४१३७०५ | मुख्याधिकारी, राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर.४१३७०५. |

**सुनावणी दिनांक — ०५/०८/२०२४**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २०/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि.२३/०८/२०२१ ते आजपर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** क्र./मह/कार्या/जमिन २ ब/१०९६/२०२१ अहमदनगर जिल्हाधिकारी महसुल शाखा दिनांक.२३/०८/२०२१ रोजी चे राहुरी नगर परिषद मुख्याधिकारी सो.यांना पाठविलेल्या पत्तावर राहुरी नगरपरिषद चे मुख्याधिकारी सो.काय कार्यवाही केली हया संपूर्ण माहिती सर्टिफाईड स्वरुपात मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा रचना सहाय्यक, नगर रचना विभाग, राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर. यांनी दि.१३/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागितलेल्या माहितीच्या प्रती अपिलार्थी यांना दिल्या आहेत.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १०/११/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०/११/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : दिलेली माहिती चुकीची व दिशाभुल करणारी आहे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर. यांनी दि.२२/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अपिलार्थी यांचे मागणीनुसार प्रस्तुत प्रकरणी झालेल्या कौन्सील ठरावाची प्रत, रेखांकन व बांधकाम मंजुरीच्या प्रती विनाशुल्क देण्यात याव्यात असे आदेशीत करुन प्रथम अपिल निकाली काढले आहे.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** –

(१) **अपिलार्थी**- जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

(२) **विद्यमान जन माहिती अधिकारी**- अपिलार्थी यांना दि.१३/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिली असल्याचे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष** –

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१३/१०/२०२१ च्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिली असल्याचे दिसून येते.

(२) प्रथम अपिल अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर दि.२२/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन माहिती पुरविण्याचे आदेशीत केल्याचे दिसून येते. तथापि, अपिलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहाय्यक, नगर रचना विभाग, राहुरी नगरपरिषद, राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक-२०/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१३८९/२०२२/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. 3020 24 APR 2025